# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

### प्राणीशास्त्र विभाग


लोकमत पुणे, गुरुवार, दि. १४ डिसेंबर २०१७

**दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र**

राजगुरुनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने दि. १५ व १६ डिसेंबर रोजी 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन पुणे विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. विजय नारखेडे यांच्या हस्ते आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.


सकाळ

**राजगुरू महाविद्यालयात आजपासून चर्चासत्र**

राजगुरुनगर, ता. १४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने १५ व १६ रोजी 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन पुणे विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. विजय नारखेडे यांच्या हस्ते आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. चर्चासत्रात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. गणेश पवार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. व्ही. मुळे, प्राचार्य डॉ. दिलीप भारमळ, डॉ. गुलाब राजे, डॉ. राजेंद्र माळी, डॉ. राधाकृष्ण पंडित, प्राचार्य डॉ. संजय खरात, प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. समारोप संस्थेचे मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. संभाजीराजे भोसले, पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र कुंभार या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

केसरी पुणे, १५ डिसेंबर २०१७ ३

## राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने दि. १५ व १६ डिसेंबर रोजी 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन येथे करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन पुणे विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. विजय नारखेडे यांच्या हस्ते आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या चर्चासत्रात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. गणेश भवाने, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. व्ही. मुळे, प्राचार्य डॉ. दिलीप भारमळ, डॉ. गुलाब राजे, डॉ. सतीश माळी, डॉ. राधाकृष्ण पंडित, प्राचार्य डॉ. संजय खरात, प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे. चर्चासत्राचा समारोप संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, पर्यावरणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. संभाजीराजे भोसले, पक्षीतज्ज्ञ डॉ. राजेंद्र कुमार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व चर्चासत्राचे समन्वयक डॉ. एस. बी. पाटील यांनी केले आहे.

सकाळ ३

# शाश्वत विकासाचे सूत्र आज गरजेचे

## देवेंद्र बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरुनगर येथे पर्यावरणावर राज्यस्तरीय चर्चासत्र

राजगुरुनगर, ता. १८ : पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी शाश्वत विकासाचे सूत्र अंगीकारणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी येथे केले.

गुणवत्ता सुधार योजनेतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अॅड.




राजगुरुनगर (ता. खेड) : पर्यावरण समतोलाबाबत हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील.

माणिकराव पाटोळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एस. एस. जो. प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या चर्चासत्रात सुमारे ६५ संशोधक अभ्यासक सहभागी झाले होते.

बुट्टे पाटील म्हणाले, "औद्योगिकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड प्रमाणात ऱ्हास होत चालला असल्याने त्याला विकास कसे म्हणायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. भविष्यात सजीव सृष्टीच्या अस्तित्वावर गदा येणार असल्याने पर्यावरणाचा समतोल राखणे हेच मानवजातीसमोरील मोठे आव्हान बनले आहे."

सध्याची सरकारी धोरणे पर्यावरणाचे संवर्धन करण्यास पुरेशी नाहीत. किमान प्लॅस्टिकबंदी, कीटकनाशकांचा कमीत कमी वापर, सांडपाण्यावर प्रक्रिया करून नदीत सोडणे हे उपाय तरी केले पाहिजेत, असे प्रा. आर. एस. पंडित यांनी सांगितले.

मानवनिर्मित घटकांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला असून, निसर्गाचे संवर्धन करणे आपली प्राथमिक जबाबदारी आहे, असे चर्चासत्राचे समन्वयक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी सांगितले.

चर्चासत्राच्या विषयाच्या अनुषंगाने पोस्टर व सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. चर्चासत्राचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. डी. एन. बिजवडे, प्रा. डी. एल. वाळुंजकर, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. डी. एल. टाकळकर, एन. ए. नायकवाडी आदींनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश मुंढे व मधुरा वाघ यांनी केले. आभार गुलाबशी गुप्ता शिंदे मानले.

लोकमत

# पर्यावरणसंतुलन राखणे गरजेचे : बुट्टेपाटील

लोकमत न्यूज नेटवर्क




संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

राजगुरुनगर : औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड प्रमाणात होत चाललेला ऱ्हास, जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गाचे बिघडत चाललेले संतुलन या पार्श्वभूमीवर ढासळत्या पर्यावरणाचे संतुलन राखणे हे माणसासमोरील सर्वात मोठे आव्हान निर्माण झाले आहे. विश्वाशी, निसर्गाशी एकरूप असलेल्या शाश्वत विकासाचे सूत्र आपण सर्वांनी स्वीकारायला हवे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आयोजित 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयांवरील दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे संचालक कोंडिभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अॅड. माणिकराव पाटोळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. बुट्टेपाटील म्हणाले, प्रचंड झालेली वृक्षतोड, हवा-पाण्याचे वाढलेले प्रदूषण, पाण्याचा अविवेकी वापर, मरणप्राय होत चाललेले नैसर्गिक स्रोत, प्रकाश परावर्तित करणाऱ्या काचा यामुळे जागतिक तापमानवाढ झाली आहे. परिणामी उष्माघात, बिगरमोसमी पाऊस, वादळ, पूर, त्सुनामी, हिमस्खलन, बर्फ वितळणे अशा अनेक समस्यांमुळे सजीवसृष्टीच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण झाला आहे. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. या चर्चासत्रात सहभागी झालेल्या ५० संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

Hello Pune Gramin
Page No. 9 Dec 17, 2017
Powered by: erelego.com

'पर्यावरणावर होणारा विविध घटकांचा परिणाम व उपाय' विषयावर चर्चासत्रास प्रतिसाद

# वाढते तापमान, औद्योगीकरणाने नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास

। राजगुरुनगर प्रतिनिधी।

औद्योगिकीकरण व वाढत्या तापमानामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असून, पर्यावरणाचे ढासळलेले संतुलन रोखणे हे आज सर्वात मोठे आव्हान निर्माण झाले आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे -पाटील यांनी केले. गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागातर्फे 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.




## अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन

### यांची होती उपस्थिती

**याप्रसंगी** संस्थेचे संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अॅड. माणिकराव पाटोळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. समारोप संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या उपस्थितीत झाला.

### स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

» **यावेळी** चर्चासत्रातील सहभागी अभ्यासक संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पोस्टर व मौखिक सादरीकरण स्पर्धेतील विजेते टी. जी. देवकर, जी. आर. बोऱ्हाडे, अपूर्वा भोसले व किरण पारधी, तसेच पी. एम. पवार, प्रतिभा बोंबले, एस. व्ही. गुंजाळ व एस. एस. मांजरे यांचा गौरव करण्यात आला.

### तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

» **पुण्याच्या** मॉर्डन कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय खरात यांनी पाणी प्रदूषणामुळे जलचरांवर झालेल्या परिणामांची माहिती दिली. प्रा. आर. एस. पंडित यांनी वाढत्या नियोजनशून्य औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाच्या झालेल्या ऱ्हासाची कारणमीमांसा सांगितली. डॉ. सुधीर वाघ यांनी काही किटकांपासून पर्यावरणावर होणारे परिणाम सांगितले. डॉ. बबन टिळेकर यांनी वृक्षतोड, औद्योगिकीकरण, शहरीकरण यांच्या पर्यावरणावरील परिणामांची माहिती दिली. समन्वयक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मानवनिर्मित घटनांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला असून, निसर्गाचे संवर्धन करणे सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगितले.

पुणे जिल्हा उत्तर ११ पुढारी पुणे, रविवार १७ डिसेंबर २०१७



शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

# शाश्वत विकासाचे सूत्र स्वीकारा : ॲड. बुट्टे पाटील

## राजगुरू महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

राजगुरुनगर : प्रतिनिधी

औद्योगिकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड प्रमाणात होत चाललेला ऱ्हास, जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गाचे बिघडत चाललेले संतुलन या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे ढासळलेले संतुलन राखणे हे मानवजातीसमोर सर्वांत मोठे आव्हान निर्माण झाले आहे. त्यासाठी एकरूप असलेल्या शाश्वत विकासाचे सूत्र आपण सर्वांनी स्वीकारायला हवे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिकराव पाटोळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. बी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या चर्चासत्रात सुमारे ६५ संशोधक अभ्यासक सहभागी झाले होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, पर्यावरणाच्या होणाऱ्या प्रचंड ऱ्हासामुळे सजीव सृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. जगातील सर्व देशांनी या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन एकत्रित प्रयत्न करायला हवेत. जागतिक तापमान सातत्याने पुढे जाणार नाही याची काळजी घ्यायला हवी. या वेळी या चर्चासत्रात सहभागी अभ्यासक प्रा. डॉ. संजय खरात, प्रा. आर. एस. पंडित, डॉ. सुधीर वाघ, डॉ. बबन टिळेकर आदी अभ्यासकांनी प्रदूषणाचे विविध प्रकार सांगून त्याची कारणमीमांसा केली.

या चर्चासत्रात सहभागी झालेल्या अभ्यासक संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. चर्चासत्राच्या विषयाच्या अनुषंगाने पोस्टर व मौखिक सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. पोस्टर सादरीकरणात प्रथम क्रमांक भारती विद्यापीठाच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयाचे टी. डी. देवकर, द्वितीय क्रमांक हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे जी. आर. बोराडे, तर तृतीय क्रमांक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, साताराच्या अपूर्वा भोसले यांना आला. उत्तेजनार्थ बक्षीस अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या किरण पाटील यांना मिळाले.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. डी. एस. बिराडे, प्रा. डी. एन. वाळकोळी, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. डी. एल. टाकळकर, एस. ए. गायकवाड यांच्यासह प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी चर्चासत्राचे आयोजनात सहकार्य केले. चर्चासत्राचा समारोप संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या उपस्थितीत झाला.

लोकमत पुणे, रविवार, दि. १७ डिसेंबर २०१७ | ३

# पर्यावरणसंतुलन राखणे गरजेचे : बुट्टेपाटील

लोकमत न्यूज नेटवर्क



संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

राजगुरुनगर : औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड प्रमाणात होत चाललेला ऱ्हास, जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गाचे बिघडत चाललेले संतुलन या पार्श्वभूमीवर ढासळणारा पर्यावरणाचे संतुलन राखणे हे मानवासमोरील सर्वात मोठे आव्हान निर्माण झाले आहे. विश्वासी, निरंतरी एकरूप असलेल्या शाश्वत विकासाचे सूत्र आपण सर्वांनी स्वीकारायला हवे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आयोजित 'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे संचालक कौशिभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिकराव पाटोळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. बी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. बुट्टेपाटील म्हणाले, प्रचंड झालेली वृक्षतोड, हवा-पाण्याचे वाढलेले प्रदूषण, पाण्याचा अतिरेकी वापर, परप्रदान होत चाललेले नैसर्गिक स्रोत, प्रकाश परावर्तित करणाऱ्या काचा यामुळे जागतिक तापमानवाढ झाली आहे. परिणामी उष्मापात, विनाहंगामी पाऊस, वादळ, पूर, त्सुनामी, हिमस्खलन, बर्फ वितळणे अशा अनेक समस्यांमुळे सजीवसृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. या चर्चासत्रात सहभागी झालेल्या ५० संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सोमवार, १८ डिसेंबर २०१७ | पुणे | 3

# पर्यावरण संतुलन राखणे हे सर्वात मोठे आव्हान

## अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

राजगुरुनगर : प्रतिनिधी



औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड प्रमाणात होत चाललेला ऱ्हास, जागतिक तापमान वाढीमुळे निसर्गाचे बिघडलेले संतुलन या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संतुलन राखणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. विश्वासी, निरंतरी एकरूप असलेल्या विकासाचे सूत्र आपण सर्वांनी स्वीकारायला हवे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय या विषयावरील दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी संस्थेचे संचालक कौशीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिक पाटोळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. बी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, कैलास पाचारणे उपस्थित होते. या चर्चासत्रात सुमारे ६५ संशोधक अभ्यासक सहभागी झाले.

मॉर्डन कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय खरात यांनी पाणी प्रदूषणामुळे जलचरांवर झालेल्या परिणामांची माहिती दिली. प्रा. आर. एस. पंडित यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाच्या झालेल्या ऱ्हासाची कारणमीमांसा करून शासकीय धोरणेही पर्यावरणाचे संवर्धन करण्यास पुरेशी नाहीत असे सांगितले. डॉ. सुधीर वाघ यांनी कार्बन फिटप्रिंटपासून पर्यावरणावर होणारे परिणाम सांगितले. डॉ. बबन ठिकेकर यांनी वृक्षतोड, औद्योगिकीकरण, शहरीकरण यांच्या पर्यावरणावरील परिणामांची माहिती दिली.

चर्चासत्राचे समन्वयक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी पर्यावरण विषय निवडीमागील कारणमीमांसा करताना मानवनिर्मित घटनांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला असून निसर्गाचे संवर्धन करणे आपली प्रामाणिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

या चर्चासत्रात सहभागी अभ्यासक संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन संस्था अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. चर्चासत्राच्या विषयाच्या अनुषंगाने पोस्टर व मौखिक सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. सूत्रसंचालन वळेश सुंबरे व मधुरा वाघ यांनी केले तर आभार पूर्वानी पुजा हिने मानले.

08 **प्रभात** पुणे, सोमवार, दि. १८ डिसेंबर २०१७

# औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

राजगुरुनगर, दि. १७ (प्रतिनिधी) - [illegible]



'पर्यावरणावर होणाऱ्या विविध घटकांचा परिणाम आणि उपाय' या विषयावरील शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील व इतर मान्यवर.

[illegible]

### पोस्टर, मौखिक स्पर्धेतील विजेते

**पोस्टर सादरीकरण :** [illegible]

**मौखिक सादरीकरण :** [illegible]

**केसरी** पुणे, १७ डिसेंबर २०१७

# पर्यावरणाचे ढासळलेले संतुलन हे मोठे आव्हान

राजगुरुनगर, (वार्ताहर) : औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक [illegible]



महाळुंगे पडवळ येथे कबड्डी [illegible]

## कबड्डी स्पर्धेत [illegible]

मंचर, (प्रतिनिधी) : [illegible]

डॉ. संजय शिंदे<br>
प्रसिद्धी विभाग प्रमुख